| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २७/०७/२०१६ | | | |
| नोंदणी दिनांक | : | २७/०७/२०१६ | | | |
| निकाल दिनांक | : | १४/०८/२०२६ | | | |
| कालावधी | : | व | म | दि | |
| | | १० | ०० | १८ | |

**<u>कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (कोर्ट क्र.१), चंद्रपूर, तह. व जि. चंद्रपूर.</u>**

(पिठासीन अधिकारी श्री.आर.एस.एम.शेख)

**प्रपत्र क्र.३२ भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i))**

| **नियमित फौजदारी खटला क्र.४०३/२०१६** | | **निशाणी क्र.५४** |
|---|---|---|
| **गुन्ह्याचा तपशिल** | | रामनगर पोलीस ठाणे<br>गुन्हा क्र.४७४/२०१६,<br>भा.दं.वि.कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये. |
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>रामनगर पोलीस ठाणे, ता. जि. चंद्रपूर. |
| **तर्फे प्रतिनिधी** | | सरकारी अभियोक्ता श्री एस. डी. देरकर |
| **आरोपींचे नाव** | १. | प्रविण गोविंदा वनकर<br>वय ३१ वर्षे, धंदा – शिक्षण, |
| | २. | रितेश ओमप्रकाश रामटेके<br>वय ३५ वर्षे, धंदा – शिक्षण,<br>दोघेही राह. झांशी राणी चौक,<br>विद्यानगर वार्ड, बल्लारशाह,<br>तह. बल्लारशाह व जि. चंद्रपूर. |
| **आरोपींतर्फे** | | वकील श्री. राहिल खान |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'ब'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii ))**

| **<u>गुन्ह्याचा तपशिल</u>** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | २६.०४.२०१६ |

| | | |
|---|---|---|
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | २८.०४.२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २७.०७.२०१६ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | ०९.०१.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | ११.११.२०१९ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १३.०८.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | -- |

**आरोपींचे तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रविण गोविंदा वनकर | १५.०६.२०१६ | १७.०६.२०१६ | भा.दं.वि.कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये. | निर्दोष | - | - |
| २ | रितेश ओमप्रकाश रामटेके | १५.०६.२०१६ | १७.०६.२०१६ | | निर्दोष | - | - |

## (भाग-क)
## अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान |
|---|---|---|
| १. | राजु रामचंद्र निखाडे | सा.क्र.१, नि.क्र.३२ |
| २. | राजकुमार गोपाल नंदबंशी | सा.क्र.२, नि.क्र.३५ |
| ३. | राजु बबनराव राठोड | सा.क्र.३, नि.क्र.३८ |
| ४. | श्रीकांत गुलाबराव विरुटकर | सा.क्र.४, नि.क्र.४३ |
| ५. | अजित तोताराम राठोड | सा.क्र.५, नि.क्र.४४ |

## अभियोग पक्ष व बचाव पक्ष निशाणी

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| १. | --- | --- |

**(भाग–ड)**

मुद्देमाल

| अ.क्र | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | --- | --- |

**न्यायनिर्णय**

(दिनांक :– १४ ऑगस्ट, २०२६)

प्रस्तुत आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान (संक्षिप्त भा.दं.वि.) कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी राजु रामचंद्र निखाडे यांनी पोलीस स्टेशन रामनगर, येथे तक्रार दिली की, त्यांचे राहते घरी लवकुमार रामजतन वासवान हा एक वर्षांपासून राहत होता. तो नेहमी त्याची पल्सर गाडी क्र.एम.एच.३४/एएक्स–८३६७ ही त्यांच्या घरासमोर उभी करुन ठेवत असे. दि.२४/०४/२०१६ चे दुपारी फिर्यादीचा किरायदार लवकुमार यांनी त्यांच्या मालकीची गाडी ही लॉक करुन चाबी फिर्यादीच्या घरी ठेवून ते आपल्या मुळगावी बिहार येथे गेले. तेव्हापासुन ते दि.२७/०४/२०१६ चे सकाळी ८.३० वाजता त्यांना त्यांच्या किरायदाराने ठेवेलेली पल्सर गाडी दिसुन आली. त्यानंतर ते आपल्या डयुटीवर निघुन गेले. नंतर ते डयुटीवरुन परत आले असता सदर पल्सर गाडी त्यांना ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. त्यानंतर त्यांनी गाडीचा इतरत्र शोध घेतला असता त्यांना गाडी मिळून आली नाही. त्यामुळे सदर पल्सर गाडी क्र.एम.एच.३४/एएक्स–८३६७ किंमत रुपये ५०,०००/– मिळुन न आल्यामुळे त्यांनी अज्ञात इसमाने गाडी चोरुन नेल्याबाबत फिर्यादीने फिर्याद दिली.

३. फिर्यादीने दिनांक २८/०४/२०१६ रोजी पोलिस स्टेशन रामनगर येथे वरील घटनेच्या अनुषंगे फिर्याद दाखल केली व त्यावरुन गु.र.क्र. ४७४/२०१६ हा नोंदवण्यात आला. सदर अपराधाचा तपास पोलीस हवालदार घनश्याम जयराम

साखरकर यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, जप्त मुद्देमाल व साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. त्यानंतर तपासाअंती वरील कलमान्वये आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी क्र.२९ वर दोषारोप निश्चित केले. तसेच आरोपींचे निवेदन वेगळे निशाणी क्र.३० व ३१ वर नोंदविले. आरोपींनी सदरचे दोषाआरोप नाकबूल केले व संपरिक्षेस सामोरे जाणार असल्याचे सांगितलेवरुन सदर खटल्याची संपरिक्षा पुढे चालविण्यात आली.

५. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्याअंती निशाणी क्र. १ वरील आदेशानुसार अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यानंतर आरोपींचे निशाणी क्र.५० व ते ५१ वर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणेचा जबाब नोंदविण्यात आले. आरोपींचे सदर जबाब व त्यांच्यावतीने घेण्यात आलेल्या उलटतपासावरुन त्यांच्या विरुध्द खोटी केस करुन, त्यांना गुन्हयात अडकविल्याचा बचाव घेण्यात आल्याचे दिसुन येते. आरोपींनी स्वतःचा कोणताही पुरावा अथवा साक्षीदार तपासलेला नाही.

७. प्रस्तुत प्रकरण निकाली काढत असतांना अभियोगपक्षाचे कथन, साक्षीपुरावा व युक्तीवाद विचारात घेता माझे विचाराधीन खालील मुद्दे/वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २६.०४.२०१६ रोजी ०१.३० ते २.०० वाजण्याच्या सुमारास जगन्नाथ बाबानगर, श्रीकृष्ण कॉलनी, ढुमणे लेआऊट, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीच्या किरायदाराच्या परवानगीशिवाय फिर्यादीच्या घरुन पल्सर मोटारसायकल क्र.एम.एच./३४–ए.एक्स– | |

| | | |
|---|---|---|
| | ८३६७ ही दुचाकी चोरी केली व त्यायोगे भा.दं.वि. चे कलम ३७९ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का? | .... नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

## – कारणमिमांसा –

**मुद्दा क्र.१ करीता –**

८. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता फिर्यादी/साक्षीदार क्र.१ याला निशाणी क्र.३२ वर तपासले. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात असे सांगितले की, लवकुमार रामजतन वासवान हे त्यांच्याकडे किरायणे राहत होते व फिर्यादी हे डयुटीवर गेले असतांना त्यांच्या घरासमोर ठेवेलेली किरायदाराची गाडी क्र.एम.एच.३४/ए.एक्स–८३६७ ही त्यांना दिसली नाही. परंतु किरायदाराच्या गाडीची चाबी त्यांच्याकडे होती. तसेच त्यावेळेस लवकुमार हा बिहार येथे गेलेला होता. सदर गाडीचा त्यांनी शोध घेतला व पुढे त्यांनी लवकुमार यांना सांगुन पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. सदर तक्रार नि.क्र. ३३ व एफ.आय.आर. नि.क्र. ३४ वर त्यांच्या सहया असून त्यातील मजकूर खरा असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी असे कथन केले की, दोन तीन महिण्यांनंतर सदर गाडी त्यांना पोलीस स्टेशनमधुन मिळाली. आरोपींतर्फे सदर फिर्यादीचा उलटतपास घेण्यात आला नाही.

९. सदर पुराव्यावरुन जरी फिर्याद शाबित झाली असे गृहीत धरले तरी देखील सदर चोरी आरोपींनी केली आहे हे अभियोगपक्षाला संशयापलीकडे शाबित करणे आवश्यक आहे. परंतु महत्तवाचे म्हणजे सदर फिर्यादीने आरोपींविरुद्ध एक चक्कार शब्दही सांगितला नाही. तसेच तो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार देखील नाही. त्यामुळे इतर साक्षीदारांचा पुरावा पाहणे आवश्यक आहे.

१०. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्र.२ राजकुमार नंदबंशी यांना नि.क्र.३५ वर तपासले. सदर साक्षीदाराने त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दिनांक

२८.०४.२०१६ रोजी पोलीसांनी त्यांना दाताळा रोड चंद्रपूर येथे बोलाविले होते. त्याठिकाणी दुचाकी चोरीबाबतचा पोलिसांनी पंचनामा तयार करुन त्यावर त्यांची सही घेतली होती. सदर घटनास्थळ पंचनामा नि.क्र.३६ वर त्यांची सही असून त्यातील मजकूर खरा असल्याचे सांगितले. आरोपींतर्फे सदर पंच साक्षीदाराचा देखील उलटतपास घेण्यात आला नाही. त्यामुळे घटनास्थळ शाबीत झाले. परंतु घटनास्थळ शाबीत झाल्यानंतर देखील सदर चोरी आरोपींनी केली आहे हे अभियोगपक्षाला संशयापलीकडे शाबित करणे आवश्यक आहे.

११. सदर प्रकरणात पुढे अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्र.३ राजु बबनराव राठोड यांना नि.क्र. ३८ वर तपासले. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात असे सांगितले की, दि.१३.०६.२०१६ रोजी पोलीसांनी त्यांना बल्लारशहा पो.स्टे. येथे बोलाविले होते. तेथे ए.पी.आय. राठोड आले होते, त्यांनी त्यांना चंद्रपूर येथील काही गाड्या चोरीला गेल्या आहेत त्यानिमित्ताने जाकीर हुसैन वार्ड येथे जायचे आहे असे सांगितले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत पोलीस कर्मचारी व आरोपी होते. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पुढे असे सांगितले की, आरोपीने त्यांचे घर दाखविले होते, आरोपीच्या घरामध्ये चोरीची एक १२१२ नंबरची गाडी, एक ६०१० नंबरची गाडी व एक विना नंबरची गाडी अश्या तीन गाडया दिसल्या होत्या. सदर गाड्या पोलीसांनी ताब्यात घेतल्या. आरोपी क्र.१ च्या घराच्या बाजुला रोड आलांडुन आरोपी क्र.२ चे घर होते. त्याच्या घरी जाऊन झडती घेण्यात आली असता, तेथे सुध्दा दोन मोटारसायकल सापडल्या होत्या व त्याही गाड्या पोलीसांनी ताब्यात घेतल्या. त्याचप्रमाणे, त्यासंबंधी जप्ती पंचनामा तयार करण्यात आला व त्यावर त्यांच्या सह्या घेण्यात आल्या, त्यांनी जप्ती पंचनाम्याची सत्यप्रत वस्तुक्रमांक अ वर त्यांची व दुसऱ्या दोन पंचांची व राठोड साहेबांची सही असल्याचे सांगुन सदर सह्या त्यांच्या समोरच करण्यात आल्या असल्याचे सांगितले, तसेच तो संपूर्ण कार्यवाही दरम्यान त्यांच्या सोबतच असल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराचा आरोपींतर्फे उलटतपास घेण्यात आला. सदर साक्षीदाराने

त्याच्या उलटतपासात मान्य केले की, तो पत्रकार असल्यामुळे पोलीस स्टेशनला त्याची ये जा सुरु असते व पोलीसांनी सही मागीतली तर तो सही देतो. तसेच पोलीसांच्या सांगण्यावरुन त्याने जप्ती पंचनाम्यावर सही केली होती. ऐवढेच नव्हे तर घटनास्थळावर तो गेला नव्हता व त्याच्यासमक्ष कोणतीही जप्ती झाली नव्हती हे देखील मान्य केले.

१२. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने त्यानंतर साक्षीदार क्र.४ श्रीकांत गुलाबराव विरुटकर यांना नि.क्र.४३ वर तपासले. सदर साक्षीदाराने सुरुवातीला पुराव्यात सांगितले की, सदर मोटारसायकल कोणाकडुन मिळाली होती हे त्यांना माहीती नाही. सदर साक्षीदार हा पुराव्यादरम्यान पूर्णपणे फितुर झालेला आहे व विद्वान सरकारी वकीलांनी विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांमध्ये त्यांनी मान्य केले की, त्याला माहीत झाले होते की, मोटारसायकल क्र. एम.एच.३४/ए.एक्स.–८३६७ आरोपींकडुन मिळाली होती. सदर साक्षीदाराचा पुरावा हा विश्वासार्ह वाटत नाही. कारण त्याने उत्तर सुचक प्रश्नांमध्ये आरोपींकडुन गाडी मिळाल्याचे कथन केले आहे.

१३. अभियोग पक्षातर्फे वाहन जप्ती करणारे साक्षीदार क्र.५ अजित तोताराम राठोड यांना निशाणी क्र.४४ वर तपासले. सदर साक्षीदाराने त्यांच्या पुराव्यात असे सांगितले की, ते दिनांक १३.०६.२०१६ रोजी ए.पी.आय. या पदावर स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर येथे कार्यरत होते. सदर दिवशी त्यांना माहिती मिळाली होती की, बल्लारशा येथील आरोपींच्या घरी मोटर सायकली आहेत. सदर गोष्टीची खात्री करण्याकरीता ते स्टाफसह बल्लारशा येथे गेले होते. तसेच खबरीची खात्री करण्याकरीता दोन पंच सोबत घेतले होते. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पुढे सांगितले की, त्यांनी आरोपींची माहिती घेतली होती, त्यावरुन ते आरोपी क्र.१ च्या घरी गेले होते. सदर आरोपी तेथे तीन मोटर सायकलीसह मिळून आला. त्यावेळी वाहनांचे कागदपत्रे मागितली असता आरोपीने कागदपत्रे सादर केली नाही व सदर मोटर सायकली आरोपी क्र.२ याच्यासह रामनगर, चंद्रपूर व बल्लारशा आणि राजूरा येथून चोरल्याचे सांगितले व सदर मोटर

सायकली ताब्यात घेतल्या.

१४. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, आरोपी क्र.१ ला आरोपी क्र.२ रितेश याचे घर विचारले असता त्यांनी त्याचे घर दाखविले होते. त्यानंतर ते सर्व स्टाफ आणि आरोपी क्र.१ तसेच पंच असे आरोपी क्र.२ च्या घरी गेले. तेव्हा आरोपी क्र.२ घरी मिळून आला होता. त्यावेळी आरोपी क्र.२ च्या घरासमोर देखील दोन मोटरसायकली होत्या. मोटारसायकलबाबत आरोपी क्र.२ ला कागदपत्रे मागितली असता त्या मोटरसायकली त्याने चोरी केल्याचे सांगितले होते. सदर मोटरसायकलींचे विवरण स्थानिक गुन्हे शाखा येथे देवून त्यांची माहिती घेतली असता सदर पाच मोटर सायकलींपैकी तीन मोटर सायकली चंद्रपूर रामनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून चोरी केल्याचे व एक बल्लारशा आणि एक राजूरा येथून चोरी झाल्याचे सांगण्यात आले होते. तेव्हा त्यांनी घटनास्थळी जप्ती पंचनामा तयार केला होता. सत्यप्रत जप्ती पंचनामा नि.क्र.४५ वर त्यांची सही असून त्यातील मजकूर खरा असल्याचे त्यांनी सांगितले.

१५. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर साक्षीदाराने वाहने जप्त केलेली आहेत. परंतु महत्वाचे म्हणजे सदर साक्षीदार देखील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. तसेच सदर साक्षीदाराने फक्त मोटारसायकली आरोपींच्या ताब्यातुन मिळाल्याचे कथन केले आहे. परंतु त्यांनी गुन्ह्यातील गाड्यांचे क्रमांक सांगितलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा देखील अभियोगपक्षाला सहाय करणारा नसल्याचे माझे मत आहे. त्याचप्रमाणे सदर जप्ती पंचनाम्याची मुळ प्रत अभिलेखावर दाखल करुन ती अभियोगपक्षाने शाबीत केली नाही. तेव्हा आरोपींकडुन सदर मोटारसायकली जप्त झाल्या होत्या हे संशयापलीकडे अभियोगपक्षाने शाबीत केले नाही.

१६. अभियोगपक्षाच्या कथनानुसार असे दिसुन येते की, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीची पल्सर गाडी क्र.एम.एच.३४/एएक्स–८३६७ ही फिर्यादीच्या

किरायदाराच्या परवानगी शिवाय चोरी केली होती. अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा शाबीत झाला असला तरी आरोपींनी चोरी केली असे म्हणता येणार नाही. कारण, चोरीच्या प्रकरणामध्ये आरोपींकडून जप्ती सिध्द् होणे आवश्यक असते, परंतु सदर प्रकरणामध्ये आरोपींकडून जप्ती झाली हे अभियोगपक्षाने संशयापलीकडे सिध्द् केले नाही, तेव्हा त्याचा निश्चितच फायदा हा आरोपींना होईल. दुसरे म्हणजे, तथाकथित घटनास्थळ हे मुख्य ठिकाण असताना तपासिक अंमलदार याने कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराकडे चौकशी केल्याचे दिसुन येत नाही.

१७. अभियोगपक्ष आरोपींवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी स्वतंत्र साक्षीदार व परिस्थितीजन्य असा सबळ पुरावा अभिलेखावर आणु शकलेला नाही. आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप हे अभियोगपक्षाने संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत करणे आवश्यक आहे हे फौजदारी कायद्याचे न्यायतत्व आहे. परंतु अभिलेखावरील एकंदरीत पुराव्याआधारे आरोपींवरील तोहमत अपराधाचे घटक अभियोगपक्ष शाबित करु शकलेला नाही हे स्पष्ट होते. तेव्हा आरोपींना संशयाचा फायदा मिळेल असे माझे मत आहे. अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षापर्यंत आलो आहे की, आरोपींवर ठेवलेले दोषाआरोप शाबित करण्यात अभियोगपक्षास अपयश आले असल्याने आरोपीं हे सबळ पुराव्याअभावी निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** –

१८. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे आरोपींना प्रस्तुत खटल्यामधून दोषमुक्त करणे न्यायोचित होईल. सदर प्रकरणात जप्त मुद्देमाल म्हणजेच पल्सर दुचाकी वाहन क्र.एम.एच.३४/एएक्स–८३६७ ही फिर्यादीला सुपूर्तनाम्यावर परत करण्यात आली होती व ते कायमस्वरुपी त्याच्याकडे ठेवणे योग्य राहील. यास्तव मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १) | आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान गुन्हा कलम ३७९ सहकलम ३४ मधून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २) | आरोपींचे जामीन बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येऊन त्यांना मुक्त करण्यात येते. |
| ३) | सदर प्रकरणात जप्त मुद्देमाल पल्सर दुचाकी वाहन क्र. एम.एच.३४/ए.एक्स.–८३६७ ही यापूर्वीच मुळ मालकास सुपूर्तनाम्यावर देण्यात आली असून ती त्यांच्याकडेच कायम ठेवण्यात येत आहे. अपिल कालावधी संपल्यानंतर सुपूर्तनामा बंधपत्र रद्द समजण्यात यावा. |
| ४) | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन बंधपत्र द्यावे. |
| | पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आले. |

Digitally signed by SHAIKH RASOOL SHAIKH MAULA
Date: 2026.08.14 17:29:31 +0530

दिनांक :– १४/०८/२०२६

( आर. एस. एम. शेख )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), चंद्रपूर.